सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.पीएडब्ल्यू-०२२२/प्र.क्र.६९/विशा-६ दि. २५ जून,२०२५.

**विषय** :- राज्यातील पोलीस स्टेशन स्तरावरील पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ स्तरावरील आणि जिल्हा पोलीस अधीक्षक स्तरावरील महिला दक्षता समित्यांची सुधारित रचना, कार्यपध्दती आणि कार्यकक्षा विहीत करण्याबाबत शुध्दिपत्रक.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.पीएडब्ल्यू-०२२२/प्र.क्र.६९/विशा-६,दि.२५ जून,२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०६२५१७०६१२४४२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन शुध्दीपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 27-06-2025 17:19:16

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,
पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत :-
पोलीस महासंचालक यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र राज्य,मुंबई
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**राज्यातील पोलीस स्टेशन स्तरावरील, पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ स्तरावरील आणि जिल्हा पोलीस अधीक्षक स्तरावरील महिला दक्षता समित्यांची सुधारित रचना, कार्यपद्धती आणि कार्यकक्षा विहीत करण्याबाबत शुद्धिपत्रक.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन शुद्धिपत्रक क्रमांक: पीएडब्ल्यू-०२२२/प्र.क्र.६९/विशा-६**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- २५ जून, २०२५.

**वाचा :-**

शासन निर्णय समक्रमांक, दिनांक २३.०५.२०२२

**प्रस्तावना :-**

पोलीस ठाण्यामध्ये तक्रार घेऊन येणाऱ्या महिलांना सौजन्याची वागणूक देणे, महिलांकडून प्राप्त तक्रारींची विनाविलंब दखल घेणे, पीडीत महिला व मुलींच्या तक्रारी हाताळण्याबाबत समाजातील विविध घटकांचे सहकार्य घेणे याकरिता राज्यातील पोलीस स्टेशन स्तरावरील, पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ स्तरावरील आणि जिल्हा पोलीस अधीक्षक स्तरावरील महिला दक्षता समित्यांची रचना, कार्यपद्धती आणि कार्यकक्षा विहीत करण्याबाबत उपरोक्त वाचा येथे नमूद शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनात मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने सदर दक्षता समितीमध्ये महिला वसतीगृहातील विद्यार्थिनींचा समावेश करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शुद्धिपत्रक:-**

वाचा येथे नमूद दिनांक २३.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्यात येत असून सदर शासन निर्णयातील मुद्दा ख) खालीलप्रमाणे वाचण्यात यावा.

**ख) महिला दक्षता समितीमध्ये नियुक्त करावयाचे सदस्य-**

महिला दक्षता समितीमध्ये सदस्यांची नियुक्ती खालीलप्रमाणे करण्यात यावी-

| अ. क्र. | सदस्य पात्रता | नियुक्त करावयाच्या सदस्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | डॉक्टर, वकील या व्यवसायामध्ये किमान ५ वर्षे कार्यरत महिला | **२** |
| २ | महिलांसाठी कार्यरत असलेल्या आणि महिला व बाल विकास विभागाकडून मान्यताप्राप्त/नोंदीत स्वयंसेवी संस्था (एन. जी. ओ.) यांमधील महिला प्रतिनिधी.<br>(उपरोक्तप्रमाणे महिला प्रतिनिधी उपलब्ध होऊ न शकल्यास महिला बचत गटामध्ये कार्यरत महिलांची नियुक्ती करण्यात यावी.) | **२** |
| ३ | मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळेच्या महिला मुख्याध्यापक / मान्यताप्राप्त महाविद्यालयाच्या महिला प्राचार्या.<br>(उपरोक्तप्रमाणे महिला प्रतिनिधी उपलब्ध होऊ न शकल्यास किमान ५ वर्ष अनुभव असलेल्या महिला शिक्षिकांची नियुक्ती करण्यात यावी.) | ३ |
| ४ | ग्रामीण भागातील आणि पोलीस अधीक्षक स्तरावरील महिला दक्षता समितीमध्ये जिल्हा परिषद सदस्य / पंचायत समिती सदस्य / महिला सरपंच / महिला लोकप्रतिनिधी आणि शहरी भागातील आणि पोलीस आयुक्त क्षेत्रातील परिमंडळ स्तरावरील महिला दक्षता समितीमध्ये महिला नगरसेवक/महिला लोकप्रतिनिधी | **२** |

| | | |
|---|---|---|
| ५ | **संबधित समितीच्या कार्यक्षेत्रात येणा-या नोंदणीकृत शासकीय / खाजगी महिला वसतीगृहातील विद्यार्थिनी.** | **३** |
| ६. | मागास व अल्पसंख्यांक प्रवर्गातील महिलांना दक्षता समितीमध्ये उचित प्रतिनिधित्व मिळेल याची दक्षता घेण्यात यावी. | |

२. दिनांक २३.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील इतर तरतुदी पुर्वीप्रमाणेच यापुढेही लागू असतील.

सदर शासन शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा सांकेतांक २०२५०६२५१७०६१२४४२९ असा आहे. हे शुद्धिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JAYSEN JAYPRAKASH INGOLE

Digitally signed by JAYSEN JAYPRAKASH INGOLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=fac1868a3a3bc62404072a90fb604cfa54cc0c6b396bbe9f862cb814602e0bfd, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7C9E48AC69F313DEECCD6E9EECEEA57A822C9D8CCACD64DD1C5031B045E7C1F2, cn=JAYSEN JAYPRAKASH INGOLE
Date: 2025.06.25 17:07:38 +05'30'

**( जयसेन इंगोले )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण व नगरविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन)यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (गृह/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (गृह/शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (गृह), यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (विशेष), यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. पोलीस आयुक्त, मुंबई शहर.
१२. अपर पोलीस महासंचालक (महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. राज्यातील सर्व पोलीस आयुक्त/ पोलीस अधिक्षक (अपर पोलीस महासंचालक (महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांचे मार्फत)
१४. निवडनस्ती (विशा-६), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.